महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

मंगळवार, दिनांक २७ मार्च, २०१८/चैत्र ६, १९४० (शके)

(१) वित्त व नियोजन, वने मंत्री
(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री
(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री
(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री
(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री
(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ३७

जिल्हा तांत्रिक सेवेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे राज्य शासनाच्या गट 'अ' मध्ये समायोजन करण्याबाबत

(१) * ३७६७८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०२५ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा तांत्रिक सेवेमधून राज्य शासनाकडे समायोजन झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे गट 'अ' मध्ये समायोजन करण्यासाठी दिनांक १८ जुलै, २०१३ रोजी राजपत्रामध्ये अधिसूचना निर्गमित करण्यात येऊनही माहे ऑक्टोबर, २०१७ पर्यंत त्यांचे गट 'अ' मध्ये समायोजन करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे हेतूपरस्परित्या चुकीच्या पध्दतीने समायोजन केल्यामुळे त्यांचे गट 'अ' मध्ये समायोजन करण्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

(२) वैद्यकीय अधिकारी, गट-ब यांचे गट-अ मध्ये समायोजन करण्याची लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे.

(३) दिनांक २८/०५/२००१ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेकडील जिल्हा तांत्रिक संवर्ग गट क मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना गट ब दर्जा देण्यात आला असून त्यांची विद्यमान वेतनश्रेणी रुपये ९३००-३४८०० + ग्रेड पे रुपये ४६०० अशी आहे. तथापि, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने गट ब पदावर समायोजन करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुपये ९३००-३४८००+ग्रेड पे ५४०० अशी वेतनश्रेणी देण्याबाबत आदेशित केलेले आहे. सदर आदेश शासनाच्या विरोधात असल्याने, त्याविरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपील दाखल करण्यात आलेले आहे. त्यानुसार वैद्यकीय अधिकारी, गट ब यांचे गट अ मध्ये समायोजन करण्याची बाब न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे गोंडसावरी (जि.भंडारा) लाखनी वनक्षेत्रातील सागवानाची झाडे चोरीला जात असल्याबाबत

(२) * ३९०८४ श्री.परिणय फुके : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोंडसावरी (जि.भंडारा) लाखनी वनक्षेत्रातील शासकीय जागेतील बहुमूल्य सागवानाची झाडे चोरीला जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) भंडारा वन विभागातील लाखणी वनपरिक्षेत्रातील मौजे गोंडसावरी अंतर्गत वनक्षेत्रात माहे नोव्हेंबर, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत साग प्रजातीची ३ व इतर प्रजातीच्या १९ वृक्षांची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर वृक्षतोडीसंदर्भात २ वनगुन्हे नोंदविण्यात आले असून चौकशीअंती सदरहू वृक्षतोड गावाजवळील लोकांनी त्यांची दैनंदिन गरजा भागविण्याकरीता केल्याचे आढळून आले आहे. अधिकची चौकशी वनपरिक्षेत्र अधिकारी, लाखणी यांचेस्तरावर सुरु आहे.

बीड तालुक्यातील शिवणी सिंचन प्रकल्प योजनेतील पाणी जरुड प्रकल्पात सोडणेबाबत

(३) * ३७८५७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड तालुक्यातील शिवणी साठवण तलाव प्रकल्प उंचावर आणि डोंगरी भागात असल्याने प्रकल्पातील पाणी कालव्याद्वारे सिंचनासाठी उपलब्ध करण्याकरिता अडचणी निर्माण होत आहेत, तसेच शिवणी प्रकल्पाच्या जवळच जरुड हा सिंचन प्रकल्प असून या प्रकल्पातील पाणी कालव्याद्वारे परिसरातील सुमारे पाच गावातील शेत जमिनींना देण्याची सुविधा उपलब्ध आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवणी प्रकल्पातील पाण्याची आवक आणि वापराशिवाय सांडव्यावरून वाहून जाणारे पाणी लक्षात घेता, हे पाणी कालव्याद्वारे जरुड प्रकल्पात सोडून या पाण्याचा लाभ दुष्काळग्रस्त भागातील सिंचनासाठी देण्याची मागणी शेतकऱ्यांनी दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवणी प्रकल्पातील पाणी जरुड प्रकल्पात कालव्याद्वारे सोडून अवर्षणप्रवण भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना लाभ देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिवणी प्रकल्पातील पाणी कालव्याद्वारे जरुड प्रकल्पात सोडून त्याचा लाभ मौज, बाभुळखुंटा, मौजवाडी, जरुड, नाळवंडीसह परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) शिवणी प्रकल्पातील पाणी ४ गावांना व जरुड प्रकल्पातील पाणी ४ गावांना कालव्याव्दारे शेतजमिनींना देण्याची सुविधा उपलब्ध आहे, हे खरे आहे.

(२) होय खरे आहे.

(३) होय खरे आहे. सदर मागणी केलेली आहे.

(४) दोन्ही धरणात प्राप्त होणारा प्रत्यक्ष येवा व कार्यक्षेत्रावरील प्रत्यक्ष परिस्थितीचा अभ्यास करुन उचित निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वावर वांगणी (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील नद्यांवर दमणगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत धरण बांधण्याबाबत

(४) * ३८९३० श्री.आनंद ठाकूर, श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नदी जोड प्रकल्पांतर्गत मोखाडा, जव्हार तालुक्यातून वाहणाऱ्या तीन नद्यांचे पाणी गुजरातला देण्याचा विचार शासनाने केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी जव्हार, मोखाडा तालुक्यातील (जि.पालघर) वावर वांगणी येथे वाघ, लेंडी आणि आणखी एक अशा तीन नद्यांवर खारगिहिल टेकडी येथे दमणगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत धरण बांधण्यासाठी केंद्र शासनामार्फत हजारो हेक्टर शेती संपादित केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पातून मोखाडा व जव्हार या दोन तालुक्यांना केवळ १४ टक्केच पाणी मिळणार आहे व सदर प्रकल्पामुळे अनेक गावे विस्थापित होऊन स्थानिक शेतकऱ्यांचे नुकसान होणार असल्याने प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) महाराष्ट्र व गुजरात यांच्यामधील दिनांक ०३/०५/२०१० सामंजस्य करारातील तरतुदीनुसार राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने दमणगंगा-पिंजाळ नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन मार्च, २०१५ मध्ये महाराष्ट्र व गुजरात शासनास सादर केला आहे.

सदर प्रकल्प अहवालानुसार दमणगंगा खोऱ्यात दमणगंगा नदीवर ता.त्रंबकेश्वर, जि.नाशिक येथे ४२७.०७ द.ल.घ.मी. साठवण क्षमतेचे भूगड धरण व वाघ नदीवर ता.मोखाडा, जि.ठाणे (नव्याने जिल्हा पालघर) येथे ४६०.८९६ द.ल.घ.मी. साठवण क्षमतेचे, खारगिहिल धरण बांधणे प्रस्तावित आहेत.

भूगड ते खारगिहिल धरण व खारगिहिल ते पिंजाळ धरण बोगद्याव्दारे जोडण्यात येणार असून पिंजाळ प्रकल्पात वळवून मुंबई शहराला पिण्याचे पाणी देणे प्रस्तावित आहे. सदर धरणाच्या पाणलोट क्षेत्रापैकी काही क्षेत्र गुजरात राज्यामध्ये असून त्या भागात पडणारे पाणी गुजरातला देणे प्रस्तावित आहे.

(२) राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने मार्च, २०१४ मध्ये तयार केलेल्या प्रकल्प अहवालानुसार दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पांतर्गत वाघ नदीवर खारगिहील हे धरण प्रस्तावित असून या धरणाचे बुडीत क्षेत्रासाठी १५५८ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. (६१२ हे. खाजगी, ६७६ हे. वनजमीन, २७० हेक्टर इतर)

(३) होय.

राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने तयार केलेल्या अहवालानुसार दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पांतर्गत दमणगंगा नदीवर ४२६.३९ द.ल.घ.मी. क्षमतेचे भूगड धरण व वाघ नदीवर ४६०.७९ क्षमतेचे खारगिहील धरण बांधण्यात येणार असून १००% विश्वासार्हचे अनुक्रमे २१० द.ल.घ.मी. व ३६९ द.ल.घ.मी. असे एकूण ५७९ द.ल.घ.मी. पाणी मुंबईस शहराचे पिण्यासाठी पुरवण्याचे प्रस्तावित आहे.

दमणगंगा खोऱ्यातील सिंचनासह स्थानिक वापरासाठी (सिंचन+बिगरसिंचन+पर्यावरण) ३२३.९० द.ल.घ.मी. पाणी वापर नियोजित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

"आपले सरकार सेवा केंद्राला" कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सरपंच विरोध करीत असल्याबाबत

(५) * ३७६४३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने चौदाव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना मोठ्या प्रमाणात निधी देऊन गावाच्या विकासाला गती देण्याचा केलेला प्रयत्न अयशस्वी झाला असून कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व सरपंच संघटितपणे "आपले सरकार सेवा केंद्राला" विरोध करणार असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतून ग्रामपंचायतींना "आपले सरकार सेवा केंद्राला" वर्षाला १ लाख, ४७ हजार, ९७२ रुपये द्यावे लागत असल्यामुळे ग्रामपंचायतींना आपल्या हक्काचा निधी मिळत नसल्याने सेवा केंद्राचा भुर्दंड ग्रामपंचायतींना सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गावाच्या विकासाला गती देण्याबाबत सेवा केंद्रासाठी वेगळया निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही.

(२) व (३) राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये, त्यांच्या स्वउत्पन्नातून आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

स्वउत्पन्नामध्ये ग्रामपंचायतींचे स्वत:चे उत्पन्न, १४ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधी, आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त निधी व इतर कोणताही मुक्त निधी ज्याचा पूर्णपणे खर्च करण्याचा ग्रामपंचायतींना अधिकार आहे, अशा बाबींचा समावेश होतो.

वरील निधीतून आपले सरकार सेवा केंद्रांतर्गत प्रशासनाचे संगणकीकरण, ग्रामपंचायतीद्वारे देण्यात येणारे दाखले, इतर विभागाच्या ४०० पेक्षा अधिक सेवा तसेच लोकांसाठी इतर उपयोगी सेवा देण्यात येत असल्याने सेवा केंद्रांचा भुर्दंड ग्रामपंचायतींना बसण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात गर्भलिंग निदान तपासणीसाठी आधारकार्ड जोडण्याबाबत

(६) * ३७९४६ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गर्भलिंग निदान तपासणी केंद्र बंद असल्यामुळे राज्यातील विवाहित दांपत्य गोवा, मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक, छत्तीसगड व तेलंगणा आदी राज्यात जाऊन गर्भलिंग निदान तपासणी करीत असल्याबाबत पर्यवेक्षकीय काम करणाऱ्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेदरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गर्भलिंग निदान तपासणीसाठी आधारकार्ड जोडण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात ८,०३६ सोनोग्राफी सेंटर्स कार्यान्वित आहेत. तथापि, सदर केंद्रात कायद्याच्या तरतूदीप्रमाणे गर्भलिंग निदान तपासणी करण्यास प्रतिबंध आहे. राज्यातील काही विवाहीत दांपत्य सिमेलगतच्या इतर राज्यांमध्ये जावून सोनोग्राफी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) नाही.

कायद्याने गर्भलिंगनिदान तपासणी करण्यास प्रतिबंध आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील पर्यटन स्थळांचा विकास करण्याबाबत

(७) * ३९०७८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भाचे नंदनवन अमरावती, चिखलदरा, विदर्भाची पंढरी कौंडण्यपूर, जगाला स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या संत गाडगेबाबांची निर्वाणभूमी वलगाव अशा अनेक धार्मिक तसेच पर्यटन स्थळांचा विकास होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी सुविधा नसल्याने पर्यटक येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिखलदरा श्रीक्षेत्र बहिरम (जि.अमरावती), मेळघाट व्याघ्रप्रकल्प, छत्री तलाव, वागळी यासह धार्मिक स्थळ म्हणून ओळख असलेल्या अंबादेवी, एकवीरादेवी, गुरुकुंज मोझरी, अमरावतीपासूनच जवळ असलेले मुक्तागिरी अशी अनेक ठिकाणे महाराष्ट्राच्या नकाशावर अधोरेखित नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने पर्यटनक्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार रावल : (१) नाही. श्री क्षेत्र कौंडण्यपूरचा रुपये २० कोटीचा आराखडा मंजूर आहे. चिखलदरा येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे चार पर्यटक निवास आहेत. तसेच संत गाडगेबाबांचे समाधीस्थळ (वलगाव) चा रुपये ३७.८७ कोटीचा आराखडा मंजूर आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे वलाना (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथे स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(८) * ३९१८६ श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वलाना (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथे स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय बांधकामासाठी प्रत्येक लाभार्थींना शासनाकडून वलाना ग्रामपंचायतीकडे निधी देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निधी ग्रामसेवक वलाना यांनी शौचालय बांधण्याकरीता लाभार्थींना न देता गैरव्यवहार केला असल्याने स्थानिक जनतेनी, तसेच लोकप्रतिनिधींनी गटविकास अधिकारी, सेनगांव तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित ग्रामसेवकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

(२) होय.

(३) या प्रकरणात गटविकास अधिकारी, सेनगांव यांनी केलेल्या चौकशीत वरील तक्रारीत तथ्य असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे संबंधित ग्रामसेवकास दिनांक २१/११/२०१७ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी देखील करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील शासकीय रुग्णालयात डॉक्टरांच्या दुर्लक्षामुळे बालकाचा मृत्यू झाल्याबाबत

(९) * ३८०४८ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जनार्दन चांदूरकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील शासकीय रुग्णालयात डॉक्टरांच्या दुर्लक्षामुळे लसीकरण केल्यानंतर हर्षल जाधव या साडेतीन वर्षाच्या बालकाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने जाधव कुटुंबियांना रुपये ३ लाखची नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाला आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयोगाने दिलेल्या आदेशानुसार शासनाने जाधव कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यासोबतच या बालकाला लस देण्यापूर्वी त्याची लसीकरण पूर्व चाचणी न करणाऱ्या डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे. कु.हर्षल चिंतामणी जाधव या बालकाचा मृत्यू दिनांक २१/११/२०१३ रोजी झाला तथापि, सदर मृत्यू लसीकरणामुळे तसेच डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झालेला नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने कु.जाधव याच्या कुटुंबियांना ३ लाख रुपये नुकसान भरपाई का देण्यात येऊ नये याबाबत विचारणा केली आहे.

कु.हर्षल जाधव याच्या मृत्यूप्रकरणी जिल्हास्तरीय AEFI समिती, राज्यस्तरीय AEFI समिती व राष्ट्रीयस्तरीय AEFI समिती यांनी दिलेल्या अहवालानुसार बाळाचा मृत्यू लसीकरणामुळे झालेला नाही. त्यामुळे जाधव कुटुंबियांना ३ लाख रुपयांची मदत अनुज्ञेय नसल्याबाबत राष्ट्रीय

मानवाधिकार आयोगास अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात लसीकरण पूर्व चाचणी न करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात 'स्वाईन फ्ल्यू' आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

(१०) * ३८३२८ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक ३४८२५ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वाईन फ्ल्यू वाढत असताना बहुतांश शासकीय रुग्णालयात स्वाईन फ्ल्यू प्रतिबंधात्मक लसीचा पाच महिन्यापासून तुटवडा निर्माण झाल्याचे तसेच गर्भवतींना प्रतिबंधात्मक लस देण्याचे काम बंद झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑगस्ट, २०१७ ते आजपर्यंत स्वाईन फ्ल्यूने नागपूर, अमरावती, सातारा, सांगली येथील ४ गर्भवतींचा मृत्यू झाला तर ४ मार्च, २०१७ ते आजपर्यंत अहमदनगर, पुणे, अमरावती, नागपूर व नाशिक येथील प्रसुतीनंतर ५ महिला स्वाईन फ्ल्यूने दगावल्या असल्याचे आरोग्य विभागाच्या अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात वर्षभरात स्वाईन फ्ल्यू या आजाराने ७७४ व्यक्तींचा मृत्यू झाला असल्याचे व सहा हजारांहून जास्त रुग्णांना स्वाईन फ्ल्यूची लागण झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून नाशिक, नागपूर व पुणे या विभागात स्वाईन फ्ल्यूने सर्वाधिक मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्वाईन फ्ल्यू या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे,

सन २०१७ मध्ये उपलब्ध झालेल्या लस साठयाची मुदतबाह्य दिनांक ३१ मे, २०१७ अशी होती. त्यामुळे सदर लस मे अखेर वापरण्यात आली. त्यानंतर राज्यपातळीवरील खरेदी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत फ्ल्यू प्रभावीत जिल्हयांना स्थानिक पातळीवर लस खरेदीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला तसेच महानगरपालिकांनाही त्यांच्यास्तरावर लस खरेदी करण्याचा सूचना देण्यात आल्या होत्या.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) स्वाईन फ्ल्यू लस उपलब्धतेबाबत आवश्यक ती पावले उचलली असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील उपाययोजना नियमितपणे करण्यात येतात.

- फ्ल्यू सदृश्य रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.
- फ्ल्यू सदृश्य रुग्णांवर वर्गीकरणानुसार विनाविलंब उपचार.
- राज्यातील उपजिल्हा रुग्णालयात तसेच वैद्यकीय महाविदयालयांच्या रुग्णालयात विलगीकरण कक्षाची स्थापना.
- उपचार सुविधा असणाऱ्या सर्व खाजगी रुग्णालयांना स्वाईन फ्ल्यू उपचाराची मान्यता.
- राज्यातील ५ शासकीय प्रयोगशाळांमार्फत मोफत निदान सुविधा.
- रेलिगेअर आणि डॉ.लाल पॅथॉलॉजी लॅबसह इतर १९ खाजगी प्रयोगशाळांना मान्यता.
- खाजगी प्रयोगशाळांना मान्यता देण्यासाठी तज्ञ समितीची स्थापना.
- ऑसेलटॅमीवरीचा पुरेसा साठा.

- दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीतील गरोदर मातांसोबतच मधुमेह आणि उच्च रक्तदाब असणाऱ्या व्यक्तींना आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना मोफत फ्ल्यू प्रतिबंधक लसीकरण.
- महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची स्थापना.
- अन्न व औषध विभागामार्फत सर्व खाजगी औषध दुकांनामध्ये ऑसेलटॅमीवर उपलब्ध ठेवण्यासाठी आंतरविभागीय समन्वय.
- शासकीय आणि खाजगी डॉक्टरांच्या स्वाईन फ्ल्यू कार्यशाळा
- फ्ल्यू प्रतिबंधासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात सर्वाधिक कुष्ठरोग्यांची नोंद झाल्याबाबत

(११) * ३८९९८ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, प्रा.डॉ.तानाजी सावंत, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने महाराष्ट्रातून सन २००५ मध्ये कुष्ठरोगाचे उच्चाटन झाले असल्याबाबत जाहीर केले असून या रोगाची निदान करणारी त्वचाविलेपन तपासणी पध्दत बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सन २०१७ मध्ये एका खाजगी संस्थेने पाहणी केलेल्या सर्वेक्षणात नव्याने ५००० कुष्ठरुग्णांची नोंद झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) मुंबई सारख्या मोठ्या शहरात स्थलांतरित कुष्ठरोग्यांपासून मोठ्या प्रमाणात इतरांना संसर्ग होऊ शकतो ही चिंतेची बाब लक्षात घेता अशाप्रकारचा संसर्ग इतरांना होऊ नये म्हणून शासनाकडून काही उपाययोजना करण्यात आल्या आहेत काय, त्याचे स्वरुप काय आहे व साधारणत: कधीपासून सदर मोहीम पुन्हा कार्यान्वित करण्यात येईल,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

राज्य शासनाने महाराष्ट्रातून सन २००५ मध्ये कुष्ठरोगाचे दुरिकरण जाहीर केले आहे. (कुष्ठरोग दुरिकरण म्हणजे कुष्ठरोग ही समाजामध्ये आरोग्याची समस्या राहिलेली नसण्याइतके प्रमाण कमी होणे.)

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कुष्ठरोगाचे निदान हे शारिरीक लक्षणांवरुन सहज करता येत असल्याने प्रत्येक रुग्णांचे विलेपन घेण्याची आवश्यकता नाही. ज्या रुग्णांचे निदान करत असताना अडचणी येते अशा प्रत्येक रुग्णाच्या त्वचेचे विलेपन घेऊन त्या रुग्णाची निदान निश्चित करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) मुंबईमध्ये ४ पर्यवेक्षकीय नागरी कुष्ठरोग पथक, मुंबई महानगरपालिकेचे ॲक्वर्थ लेप्रसि हॉस्पिटल व ६ स्वयंसेवी संस्था कार्यरत असून त्यांच्यामार्फत विविध सर्वेक्षण व जनजागृती मोहिमेद्वारे स्थानिक लोकसंख्येसह स्थलांतरित लोकसंख्येची तपासणी करुन लवकरात लवकर रुग्ण शोधून त्यांना त्वरीत बहुविध औषधोपचाराखाली आणून संसर्गाची साखळी खंडीत केली जाते. तसेच मुंबई शहरात फोक्सड् लेप्रसी कॅम्पेन व हार्ड टू रिच एरिया प्लानिंग यासारखी अभियानेही राबविण्यात येत आहेत.

याशिवाय इतर राज्य व जिल्ह्यातून आलेल्या स्थलांतरित कुष्ठरुग्णांनाही त्यांच्या रोगनिदानाप्रमाणे त्वरीत बहुविध औषधोपचाराखाली आणले जाते.

(४) स्थलांतरित कुष्ठरुग्णांना नियमितपणे शोधून त्वरीत औषधोपचाराखाली आणले जाते, त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

(५) विलंब झालेला नाही.

नाबार्ड आणि पंतप्रधान कृषी सिंचन योजनेच्या माध्यमातून मराठवाडयाला निधी मिळण्याबाबत

(१२) * ३९१३१ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाबार्ड आणि पंतप्रधान कृषी सिंचन योजनेच्या माध्यमातून राज्याला रुपये १६६०४ कोटीचा निधी मिळणार असून यात मराठवाडयाला १३७२ कोटी (८ टक्के) मिळणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयाचा सिंचनाचा अनुशेष ६.३७ टक्के कायम राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अपेक्षित निधीची तरतूद करुन मराठवाडयाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) पंतप्रधान कृषी सिंचन योजनेत समाविष्ट बांधकामाधीन २६ प्रकल्प पूर्ण करणेसाठी केंद्रीय अर्थसहाय्य व नाबार्डच्या माध्यमातून कर्जाच्या स्वरूपात रुपये १६६०४ कोटी इतका निधी राज्यास मिळणार आहे.

यात मराठवाड्यातील निम्न दुधना प्रकल्प, नांदूर मधमेश्वर प्रकल्प टप्पा-२, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प व उर्ध्व कुंडलीका प्रकल्प या ४ प्रकल्पांचा समावेश असून या प्रकल्पांना रुपये १७३२ कोटी निधी मिळणार आहे.

(२) निर्देशांक व अनुशेष समितीने सन १९९४ च्या पातळीवरील तत्कालीन ३० जिल्ह्यातील अनुशेषाची गणना केल्यानुसार सद्य:स्थितीत मराठवाड्यात सिंचनाचा अनुशेष शिल्लक नाही. तथापि, मा.राज्यपाल महोदयांनी त्यानंतर निर्माण झालेल्या हिंगोली जिल्ह्यातील सन १९९४ च्या पातळीवरील १५१६० हेक्टर (रबी समतुल्य) अनुशेष ग्राह्य धरला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मांगरूळ (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे वृक्षांना आग लावण्यात आल्याबाबत

(१३) * ३९३९३ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांगरूळ (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे लोकसहभागातून लावण्यात आलेल्या एक लाख वृक्षांना आग लावण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर आगीमुळे २० हजार झाडांचे नुकसान झाल्याने आणि सूक्ष्मजीव नष्ट झाल्याने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) ठाणे वनविभागातील बदलापूर वनपरिक्षेत्रातील मौजे मांगरुळ येथे लोकसहभागातून लावण्यात आलेल्या रोपवनाला दिनांक १९/१२/२०१७ रोजी स.नं. १०६, ११३ व मौजे वसार स.नं. १३ रोपवन क्षेत्राला दुपारी १.३० वाजण्याचे सुमारास आग लागल्याचे आढळून आले आहे. त्यामध्ये ८ हेक्टर क्षेत्रावरील अंदाजे २० हजार रोपांना आगीची झळ बसल्याचे दिसून आले आहे. सदरहू आगीमध्ये वाळलेले गवत व पालापाचोळा जळल्याने रुपये ४००० इतके नुकसान झाल्याचे दिसून आले आहे.

(२) प्रकरणी तात्काळ दखल घेऊन वनपरिक्षेत्र अधिकारी बदलापूर, क्षेत्रिय कर्मचारी व ग्रामस्थांच्या मदतीने वन वणवा विझवण्यात आला. सदरच्या वनगुन्हयाबाबत भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये अज्ञात इसमाविरुध्द वनगुन्हा राऊंड गुन्हा क्र. ७ एफ/२०१७ दिनांक १९/१२/२०१७ अंतर्गत जारी करण्यात आला. त्यानुषंगाने आरोपीचा शोध घेण्याबाबत पुढील चौकशी सुरु आहे.

सदरच्या वनगुन्हयातील अज्ञात इसमाविरुध्द हिल लाईन, पोलीस स्टेशन, उल्हासनगर-५ यांचेकडे दिनांक २०/१२/२०१७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

घारापुरी बेटावरील गावांना वीज पुरवठा करण्याबाबत

(१४) * ३९६९९ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पर्यटन महामंडळाने घारापुरी बेटावरील गावांना साडेतीन तास वीज पुरवठा करणाऱ्या जनरेटरसाठी डिझेल पुरविणाऱ्या ठेकेदाराचे माहे डिसेंबर, २०१६ पासून आजपर्यंत जवळपास रुपये ४० लाख थकविले असल्याने डिझेल पुरवठ्याअभावी व पर्यटन विभागाच्या संथ कारभारामुळे जागतिक किर्तीचे घारापुरी बेट वीज पुरवठयाअभावी अंधारात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकीत देयके अदा केल्याशिवाय डिझेलचा पुरवठा करण्यास ठेकेदाराने असमर्थता दर्शविल्याचे लेखी पत्र पर्यटन विभागास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज देयके थकित ठेवणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार रावल : (१) नाही. घारापुरी बेटास वीज पुरवठा करणाऱ्या जनरेटरमध्ये दिनांक २९/१०/२०१७ रोजी तांत्रिक बिघाड झाल्याने ते नादुरुस्त होते. परंतु, दोन जनरेटर असल्याने एक दिवसाआड शेतबंदर व राजबंदर या गावांना वीज पुरवठा करण्यात येत होता. वीज पुरवठा हा एक दिवस शेतबंदर व एक दिवस राजबंदर अशा प्रकारे दिनांक २९/१०/२०१७ ते १२/१२/२०१७ पर्यंत खंडीत होता. परंतु, महामंडळाने सदर जनरेटर ताबडतोब दुरुस्त करुन रुपये २,५६,०००/- चे देयक अदा करुन दिनांक १३/१२/२०१७ रोजी सदरचे जनरेटर दुरुस्त करुन खंडीत झालेला एक दिवसाआड वीज पुरवठा सुरळीत सुरु करण्यात आला होता. सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून वीज जोडणी झाली असून दिनांक २२/०२/२०१८ पासून नियमित विद्युत पुरवठा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून केला जात आहे. त्यामुळे त्या दिनांकापासून जनरेटरद्वारे घारापुरी येथे विद्युत पुरवठा बंद करण्यात आला आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील सरपंचांना मानधन व अन्य सुविधा देण्याबाबत

(१५) * ४०००६ श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंचांना मानधन देण्याबाबतचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंचांना मानधन व अन्य सुविधा देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाचा सर्वसाधारण तपशील काय आहे व सर्वसाधारण आर्थिक खर्च किती करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामपंचायतीच्या सरपंचांना मानधन व अन्य सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय. हे खरे आहे.

राज्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंचांच्या मानधनाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०६/०१/२०१८, दिनांक ०८/११/२०१७ व दिनांक ०३/०८/२०१७ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(२) ग्रामविकास विभागाच्या दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये सरपंचांच्या मानधनात व ग्रामपंचायत सदस्यांच्या बैठक भत्त्यात वाढ करण्यात आली असून लोकसंख्यानिहाय वर्गवारी विचारात घेऊन सरपंच मानधन प्रति महिना रुपये १०००/-, रुपये १५००/-, रुपये २०००/- व ग्रामपंचायत सदस्य बैठक भत्ता प्रति बैठक रुपये २००/- इतका निश्चित करण्यात आला आहे.

(३) उपरोक्त दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्त्यामध्ये करण्यात आलेली वाढ विचारात घेता प्रती माह रुपये ५.४२ कोटी अधिक निधीची आवश्यकता आहे.

(४) व (५) उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने वित्त विभागाने दिलेल्या निदेशानुसार वाढीव दराने सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्ता अदा करण्याकरीता पुरवणी मागणीद्वारे निधी उपलब्ध करून घेणेबाबत कार्यवाही करण्यात आली. आता वरील वाढीव दरानुसार सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये रक्कम उपलब्ध करून देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री मातृवंदना केंद्र पुरस्कृत योजना राज्यात १०० टक्के लागू करण्याबाबत

(१६) * ४०४६८ श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माता व बालमृत्यूचा दर कमी करण्यासाठी तत्कालीन केंद्र शासनाने इंदिरा गांधी मातृत्व केंद्र पुरस्कृत योजना देशात १०० टक्के लागू केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंदिरा गांधीच्या नावाने अंमलात असलेली सदर योजना सध्याच्या केंद्र शासनाने बंद करुन त्याऐवजी "प्रधानमंत्री मातृवंदना योजना" दिनांक १ जानेवारी, २०१८ पासून राज्यात लागू करण्यात येणार असल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनामार्फत जाहीर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत याऐवजी ६० टक्के केंद्र शासन व ४० टक्के राज्य शासन या तत्वावर राबविली जाणार असल्याने राज्यावर ४० टक्के निधीचा आर्थिक भार पडणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना पूर्वीप्रमाणे १०० टक्के केंद्र पुरस्कृत करण्याबाबत केंद्र शासनाकडे मागणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) नाही, हे खरे नाही.

देशातील फक्त ५३ जिल्ह्यांमध्ये सदर योजना लागू करण्यात आली होती.

(२) हे अंशतः खरे आहे.

'प्रधानमंत्री मातृवंदना योजना' ही योजना संपूर्ण राज्यात दिनांक १ जानेवारी, २०१७ पासून कार्यान्वित करण्यास शासन निर्णय दिनांक ०८/१२/२०१७ नुसार मान्यता दिलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) प्रधानमंत्री मातृवंदना योजना ही नव्याने सुरु केलेली केंद्र पुरस्कृत योजना असून राज्यांमध्ये ६०:४० टक्के या तत्वावर राबविण्यात येत आहे. त्यामुळे राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील प्राथमिक व उपप्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

(१७) * ४०६५७ श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना उत्तम आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात यासाठी ११ प्राथमिक व ५७ उपप्राथमिक आरोग्य केंद्राच्या मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे मागील दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव मंजूर न झाल्यामुळे नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण नागरिकांना आरोग्याच्या अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्राथमिक व उपप्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) अंशत: खरे आहे.

नागपूरसह राज्यातील सर्व जिल्ह्यात लोकसंख्येचा विचार करून आरोग्य संस्था मंजूर करण्यासाठी सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

नागपूर जिल्ह्यात ०२ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, ०१ स्त्री रूग्णालय, ०२ उपजिल्हा रुग्णालये, ०९ ग्रामीण रुग्णालये, ४९ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३१६ उपकेंद्रे व ३५ ॲलोपॅथिक दवाखाने अशा आरोग्य संस्थांमार्फत आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.

(३) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू असून नागपूर जिल्ह्यात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रे स्थापनेच्या मागण्या जोड बृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील निर्मल ग्रामयोजनेतील उत्कृष्ट ग्रामपंचायतींना पुरस्काराची रक्कम अदा करण्याबाबत

(१८) * ४०८३३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात ८ वर्षापूर्वी केंद्र शासनाच्या निर्मल ग्राम योजनेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या ७० ग्रामपंचायतींना पुरस्काराची दुसऱ्या टप्प्यातील रक्कम प्रशासनाच्या दिरंगाईमुळे मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समितींच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे रुपये ४० लाख ५० हजारांची रक्कम अद्याप जिल्हा परिषदेच्या बँक खात्यात जमा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने तांत्रिक बाबींची पूर्तता करुन सदर ग्रामपंचायतींना पुरस्काराची रक्कम अदा करण्याबाबत कार्यवाही करुन दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

संबंधित ग्रामपंचायती व गटविकास अधिकारी यांच्याकडून विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र व अहवाल जिल्हा कक्षास अप्राप्त असल्याने सदरची रक्कम जिल्हा परिषद, सोलापूरच्या बँक खात्यात प्रलंबित आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक अटींची पूर्तता करणेबाबत संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या असून सदर प्रकरणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर निधी वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

भायाळे (ता.चांदवड, जि.नाशिक) येथील शहीदांच्या कुटुंबियांना पंतप्रधान आवास योजनेतून घरकुल मिळणेबाबत

(१९) * ४०९०९ श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेतून ११५ घरकुले मंजूर करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भायाळे गावात (ता.चांदवड, जि.नाशिक) शहीद शंकर शिंदे यांचे पालक राहत असून त्यांनी मागील दोन वर्षापासून पंतप्रधान आवास योजनेतून घरकुल मिळावे यासाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज केला, परंतु सदरील योजनेतून शिंदे कुटुंबास प्रत्येकवेळी लाभार्थींच्या यादीतून डावलले जात असल्याची तक्रार शिंदे कुटुंबियांनी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत शिंदे कुटुंबियांनी नाशिक जिल्हाधिकारी ते राज्याच्या मुख्यमंत्र्यापर्यंत दाद मागूनही त्यांना घरकुल मंजूर झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीर जवानाच्या मातापित्यांस घरकुल योजनेला लाभ त्वरीत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही.

सन २०१७-१८ मध्ये नाशिक जिल्ह्यास प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत ८८९५ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी चांदवड पंचायत समितीला २४८ घरकुलांचे उद्दीष्ट वाटप करण्यात आले असून सर्व घरकुलांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) नाही.

तथापि, अद्याप घरकुल मिळाले नसल्याने शिंदे कुटुंबियांनी मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे दिनांक १७/३/२०१७ विनंती अर्ज सादर केला आहे.

(३) व (४) केंद्र शासनाने सन २०१६-१७ पासून प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) सुरु करण्याचा निर्णय घेतला. केंद्र शासनाने या योजनेच्या लाभार्थ्यांची निवड सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ च्या माहितीच्या आधारे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. यासाठी केंद्र शासनाने गांव व प्रवर्गनिहाय G.P.L (Generated Priority List) उपलब्ध करुन दिली असून त्याआधारे ग्रामसभेमार्फत पात्र लाभार्थ्यांची यादी प्रपत्र-ब मध्ये तयार करावयाची आहे.

केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या G.P.L यादीमध्ये समावेश नसलेल्या परंतु प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण योजनेचा लाभ देण्यासाठी पात्र ठरु शकणाऱ्या नवीन कुटुंबाचा समावेश योजनेच्या प्रतिक्षा यादीत (प्रपत्र-ड) करण्याच्या सूचना राज्य शासनाने दिलेल्या आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मधील घरकुल पात्र लाभार्थींची प्राधान्यक्रम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना परिच्छेद ४.४ मधील ४.४.२ मध्ये दिलेल्या १ ते ५ निकषाच्या आधारे निर्धारित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. प्रतिक्षा यादीमधील एका पेक्षा जास्त कुटुंबांच्या deprivation score समान झाल्यास त्यांचे प्राधान्यक्रम निश्चित करतानाचे निकष दिलेले आहेत. त्यामधील मुद्या "क" सशस्त्र कारवाईमध्ये शहिद झालेले सैनिक/अर्ध सैनिक/पोलीस दलातील कर्मचाऱ्याचे विधवा किंवा निकट संबंधी सदस्य, असा आहे.

परंतु केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या G.P.L यादीमध्ये शिंदे कुटुंबियांचे नाव समाविष्ट नसल्यामुळे त्याचा समावेश प्रपत्र-ब मध्ये होऊ शकलेला नाही.

तथापि, ग्रामपंचायत ग्रामसभा ठराव क्र. २ दिनांक १ मे, २०१७ नुसार त्यांचे नाव प्रपत्र "ड" मध्ये समाविष्ट करण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील केंद्र प्रमुखावर कारवाई करण्याबाबत

(२०) * ४०९४३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील केंद्र प्रमुख यांनी खाजगी शाळा तपासणीकरीता दोन उपशिक्षिकांसमक्ष शाळा तपासणी तसेच जेवणाचा कार्यक्रम करुन त्या कामाचे वर्णन बीभत्स भाषेत तालुका शिक्षकांसाठी केंद्र म्हसळा नावाने कार्यान्वित असलेल्या व्हॉटसअप ग्रुपवर शेअर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त केंद्र प्रमुखाची तक्रार म्हसळा पंचायत समिती, गटविकास अधिकारी व प्रभारी गट शिक्षण अधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी गट शिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे केंद्र प्रमुखांना निलंबित करण्याचा प्रस्ताव सादर केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केंद्र प्रमुख, म्हसळा यांना निलंबित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) म्हसळा (जि.रायगड) तालुक्यातील केंद्र प्रमुख यांना सदर प्रकरणी नोटीस देण्यात येऊन, त्यानुषंगाने त्यांनी केलेला खुलासा विचारात घेऊन याप्रकरणी त्यांना सक्त ताकीद देण्यात आलेली असून, सदर केंद्राचा कार्यभार त्यांच्याकडून काढून घेण्यात येऊन, महिला शिक्षिका कार्यरत नसलेल्या केंद्राचा कार्यभार त्यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मानखुर्द बालसुधारगृहातील मुले सुधारगृहाबाहेर पडत असल्याबाबत

(२१) * ४०९८१ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानखुर्द येथील बालसुधारगृहातील तीन मुले नव्या वहया, रद्दी आणि इतर सामान विकण्यासाठी निघाल्याचे मानखुर्द महामार्गाजवळ गस्त घालणाऱ्या ट्रॉम्बे पोलिसांना निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही मुले बिनधास्तपणे सुधारगृहाबाहेर पडत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिक्षक तथा अधिकाऱ्यांवर व सुरक्षारक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) मानखुर्द येथील बालसुधारगृहातील तीन मुले स्वत:च्या वहया पुस्तके विकण्यासाठी बाहेर घेवून गेले असताना ट्रॉम्बे पोलिसांना आढळून आले होते.
(३) सदर प्रकरणी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मुंबई उपनगर यांनी स्वत: चौकशी केली आहे. यामधील दोन मुले पहिल्यांदाच संस्थेबाहेर गेली होती व त्यांनी आपली चूक कबूल केली आहे. मुलांसंदर्भात या मुलांचे संस्थेमधील मानसोपचार तज्ञ, बालविकास अधिकारी, गृहपाल यांच्याकडून उपरोक्त तिन्ही मुलांना समुपदेशन केले आहे, त्यामुळे अधिक्षक तथा अधिकारी व सुरक्षारक्षकांवर कारवाई करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

एडगाव (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) जवळून वाहणाऱ्या सुख नदीला संरक्षण भिंत बांधून मिळण्याबाबत

(२२) * ४१०३१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड : तारांकित प्रश्न क्रमांक २९४७२ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्काम एडगाव (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) जवळून वाहणाऱ्या सुख नदीला पावसाळ्यात येणाऱ्या महापुराचा धोका लक्षात घेता सिंधुदुर्ग पालकमंत्री, लोकप्रतिनिधी व मा.पर्यावरण मंत्री यांनी येथे संरक्षण भिंत बांधून मिळावी म्हणून जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदीला संरक्षण भिंत बांधण्यासाठी कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, रत्नागिरी यांनी अंदाजे ६७ लाख रुपयांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नदीला संरक्षण भिंत बांधण्याच्या प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे : (१) व (२) होय, हे खरे आहे.

लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, रत्नागिरी यांचे दिनांक ०२/०३/२०१७ अन्वये पुरसंरक्षक भिंतीचे रुपये ६७.५३ लक्षचे अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देवून जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.

(३) जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, सिंधुदुर्ग यांनी कार्यकारी अभियंता (जलसंधारण) विभाग, रत्नागिरी यांनी सदर प्रकरणी दिनांक ०७/०८/१९९२ च्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाहीच्या सूचना दिलेल्या आहेत. या शासन परिपत्रकानुसार पुरसंरक्षक कामाच्या रकमेच्या १० टक्के लोक वर्गणी संबंधित स्थानिक स्वराज्यसंस्थेने सोसावयाचा आहे. ४० टक्के रक्कम शासनातर्फे सहाय्य मदत म्हणून दिली जाईल तर ५० टक्के रक्कम कर्जरुपाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था वा जिल्हा परिषदा यांना शासनामार्फत देण्यात येईल.

१० टक्के पर्यंतचा खर्च सोसावयास सदर स्थानिक संस्था/जिल्हा परिषदा प्रथमत: भरावयास तयार असतील तर तसे प्रमाणपत्र दिल्यावरच योजना प्रत्यक्ष राबविण्यात येणार असल्याने त्यानुसार लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, रत्नागिरी यांनी दिनांक ०९/०२/२०१८ अन्वये ग्रामसेवक, मौजे एडगाव यांना शासन निर्णय दिनांक ०७/०८/१९९२ मधील शर्ती मान्य आहेत किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीकडून शर्ती मान्य असतील तर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

ससून रुग्णालय (पुणे) येथे उपचारासाठी येणारे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून दुप्पट वाहन शुल्क वसूल केल्याबाबत

(२३) * ४११२८ श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रुग्णालयात उपचारासाठी येणारे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून येथील वाहनतळ ठेकेदार करारापेक्षा दुप्पट वाहन शुल्क वसूल करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर करारानुसार या वाहनतळावर असलेली वाहने चोरीला गेल्यास द्यावयाची नुकसान भरपाई या ठेकेदाराने नाकारली असून तसे पावतीवर नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) व (२) होय.

(३) संस्थेने संबंधित ठेकेदाराचा ठेका दिनांक ०७/०२/२०१८ पासून रद्द केला आहे. रूग्णहिताच्यादृष्टीने पे ॲण्ड पार्क सुविधा रूग्णालय परिसरात नव्याने सुरू करण्याकरिता ई-निविदा प्रक्रिया सुरू केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथे आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत विकास कामे मंजूर करणेबाबत

(२४) * ३७९०४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) या गावाच्या आराखड्यात नमूद तथा जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत निकषात बसणाऱ्या कामांना जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने प्राधान्याने मंजुरी देण्याची बाब विचाराधीन असल्याचे मा.नियोजन मंत्री यांनी दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास विधानमंडळात आश्वासन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ८ डिसेंबर, २०१७ रोजी नाशिक जिल्हा परिषदेने मा.नियोजन मंत्री यांच्या आश्वासनाकडे दुर्लक्ष करून प्रश्न भाग (१) मधील "क" वर्ग तीर्थक्षेत्र/यात्रास्थळे काम मंजूर न केल्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.नियोजन मंत्री व जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर गावाच्या आराखड्यातील नमूद आणि निकषात बसणारे जिल्हा वार्षिक योजनेतील नाविन्यपूर्ण योजनेतील अभ्यासिका आणि "क" वर्ग यात्रास्थळ विकासासाठी असलेल्या अनुदानातून यात्रास्थळाला वाहनतळ करण्याची कामे मंजूरीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) होय, हे खरे आहे.

(२) मंत्री, नियोजन यांचे कार्यालयाकडे अशी तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या कार्यालयाकडे दिनांक ०५/०१/२०१८ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधीकडून अशी तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून प्राप्त माहितीनुसार जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिनांक ०८/०३/२०१८ च्या प्रशासकीय मान्यतेच्या आदेशान्वये लासलगाव, ता.निफाड येथील श्री.शनैश्वर महाराज मंदिर येथील वाहनतळ बांधकामास मंजूरी दिली आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये नाविन्यपूर्ण योजनेसाठीच्या निधीत बचत झाल्यास अभ्यासिकेच्या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन निधी उपलब्ध करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

उपसंचालक आरोग्य सेवा, नागपूर यांच्या गैरकारभारामुळे कनिष्ठ लिपिक सेवा निवृत्तीवेतनापासून वंचित राहिल्याबाबत

(२५) * ३९०९३ श्री.परिणय फुके : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील उपसंचालक आरोग्य सेवा यांचे अखत्यारित असलेल्या विभागात सेवा देणाऱ्या १३ कनिष्ठ लिपिकांना तेथील गैरकारभारामुळे सेवानिवृत्तीवेतनापासून वंचित रहावे लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित कनिष्ठ लिपिकांनी वेळोवेळी अधिकाऱ्यांकडे निवेदने दिलेली आहेत परंतु या प्रकरणाची कोणीही दखल घेत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) अंशत: खरे आहे.

उपसंचालक आरोग्य सेवा, नागपूर मंडळ नागपूर यांच्या अधिपत्याखाली १३ कनिष्ठ लिपीक यांच्या नेमणूका सेवायोजन कार्यालयामार्फत तात्पुरत्या स्वरुपात होत्या व त्या सेवा अद्याप नियमित झालेल्या नाहीत. या १३ कर्मचाऱ्यांपैकी २ कर्मचारी नियत वयोमानानुसार कार्यमुक्त झाले असल्याने त्यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ देण्यात आलेले नाहीत. तथापि, या १३ कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) नाही.

उपसंचालक आरोग्य सेवा, नागपूर यांच्या अधिपत्याखालील १३ कनिष्ठ लिपिकांच्या सेवा नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर कार्यवाहीमध्ये आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनाथ विद्यार्थ्यांना नोकरीमध्ये आरक्षण देणेबाबत

(२६) * ३८०२६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९०३ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनाथ मुलांना शासकीय सेवेत एक टक्का समांतर आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये घेतला असल्याने उक्त निर्णयाचा लाभ राज्यातील २२ लाख अनाथ मुलांना होणार असून त्याचे पुनर्वसन आणि भवितव्य सुरक्षित होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नोंदणीकृत अनाथालयातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना नोकरीमध्ये योग्य आरक्षण देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनाथ मुलांना नोकरीमध्ये आरक्षण देणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती, याबाबत शासनस्तरावर विचारविनिमय पूर्ण झाला आहे काय,

(४) शासन निर्णय दिनांक ६ जून, २०१६ अन्वये अनाथ बालकांना अनाथ असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याबाबतचे अधिकार आयुक्तालयस्तरावर देण्यात आले आहेत, मात्र ही बाब सोयीची नसल्याने मागील वर्षभरात केवळ एक अनाथ प्रमाणपत्र आयुक्तालयातून देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनाथ बालकांना त्यांची सामाजिक ओळख निर्माण करण्यासाठी अनाथ प्रमाणपत्रासह आधारकार्ड, मतदान कार्ड यासारखे प्रमाणपत्र जिल्हास्तरावर मिळण्यासाठी तसेच त्यांचा बालगृह आणि अनाथालयातील कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या पुढील शिक्षण आणि उदरनिर्वाहासाठी शासन कोणती उपाययोजना करीत आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी महिला व बालविकास विभागाने मुख्य सचिव यांचेकडे पाठविलेल्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय,

तथापि, उपलब्ध अभिलेखानुसार राज्यातील महिला व बालविकास विभागाच्या अखत्यारीत असणाऱ्या संस्थांमध्ये अनाथ प्रवेशितांची संख्या ३९६२ इतकी आहे.

(२) होय.

(३) दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यातील अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गात शिक्षण व नोकरीमध्ये १ टक्के समांतर आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांना प्राप्त झालेल्या ११ अर्जांपैकी ८ अर्जदारांना अनाथ प्रमाणपत्र देण्यात आले आहे. उर्वरीत ०३ प्रस्तावांमध्ये त्रुटी असल्याने प्रस्ताव त्रुटीपूर्ततेसाठी परत पाठविण्यात आले आहेत.

(५) महिला व बालविकास विभागामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत मान्यता प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित संस्थांमध्ये दाखल असलेल्या प्रवेशितांना शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग दिनांक ०६ जून, २०१६ अन्वये अनाथ असल्याचे प्रमाणपत्र आयुक्तालयस्तरावरून निर्गमित करण्यात येते. तसेच शासन परिपत्रक महिला व बालविकास विभाग दिनांक ३० जुलै, २०१३ अन्वये अनाथ मुलांना रेशनकार्ड, रहिवासी दाखला, तसेच मतदान ओळखपत्र अशी कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करुन देणेबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे थकीत मानधन अदा करण्याबाबत

(२७) * ४११५३ श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३११७७ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी पालघर जिल्ह्यामध्ये टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी, अंगणवाडी सेविका, पोषण आहार शिजवून देणाऱ्यांचे थकीत मानधन व निधी शासनाने पूर्णपणे दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर तालुक्यातील कुपोषणाने होणारी वाढ रोखण्यासाठी अंगणवाडी सेविका व पोषण आहार शिजवून देणाऱ्या महिलांचे थकीत मानधन अदा करण्याच्यादृष्टीने मा.मंत्री महिला व बालविकास व मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य यांच्याकडे दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने मागणी केली आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे आहे.

(२) व (३) बचतगटांची देयके माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत अदा करण्यात आलेली आहे व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे मानधन माहे जानेवारी, २०१८ पर्यंत अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महिला व किशोरवयीन मुलींना माफक दरात सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करुन देण्याबाबत

(२८) * ४११७७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील महिला व किशोरवयीन मुलींना वैयक्तिक स्वच्छतेसाठी माफक दरात सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी स्वयंसहाय्यता समुहांच्या माध्यमातून सॅनिटरी नॅपकिन्सचा पुरवठा करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर योजनेची दिनांक ०७/०३/२०१८ च्या शासन निर्णयान्वये अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या योजनेचा शुभारंभ दिनांक ०८/०३/२०१८ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना २४० मीमीचे सॅनिटरी नॅपकिन्स रुपये २४/- या दराने व २८० मीमीचे सॅनिटरी नॅपकिन्स रुपये २९/- या दराने उपब्ध करुन देण्यात येणार आहेत. तसेच ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील ११ ते १९ या वयोगटातील किशोरवयीन मुलींना सदर सॅनिटरी नॅपकिन्स रुपये ५/- या दराने उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अजिंठा (जि.औरंगाबाद) येथे वन्य प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्याबाबत

(२९) * ४१०६७ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजिंठा (जि.औरंगाबाद) येथील वन्य प्राण्यांची पाण्यासाठी जंगलातील भटकंती थांबावी व त्यांनी मानवी वस्त्यांकडे वळू नये या उद्देशाने लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले अजिंठा वनक्षेत्रातील पाणवठे कोरडे असल्याने वन्यप्राणी पाण्यासाठी मानवी वस्त्याकडे येत असल्याने नागरीकांमध्ये भितीचे वातावरण पसरल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन्य प्राण्यांना पिण्याच्या पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : (१) हे खरे नाही.

अजिंठा वन परिक्षेत्रात ६ नैसर्गिक पाणवठे असून १९ कृत्रिम पाणवठे आहेत. सदर पाणवठयांमध्ये टँकरव्दारे पाणी टाकण्यात येते. वन्यप्राणी पाण्यासाठी मानवी वस्त्याकडे येत असल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ व त्यादरम्यान निदर्शनास आली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलाचा हप्ता मिळण्याबाबत

(३०) * ४११९८ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार तालुक्यातील (जि.पालघर) १६ ग्रामपंचायतीमधील प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलाचे काम दोन वर्षापूर्वी पूर्ण होऊनही ऑनलाईन प्रकियेमुळे घरकुलाचा हप्ता मिळाला नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थ्यांना शेवटचा हप्ता मिळालेला नसल्याने त्यांना वारंवार पंचायत समितीत जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील रुग्णालयांनी उपचार दराची माहिती फलकावर लावण्याबाबत

(३१) * ४०५७९ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक १०२२६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी रुग्णालयांमध्ये कोणत्या वैद्‌यकीय सुविधा पुरविल्या जातात, उपचार केले जातात, त्याचे दर काय आहेत याची सविस्तर माहिती दिली जात नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सर्व रुग्णालयांना उपचार दराची सविस्तर माहिती फलकावर दाखविण्याबाबत बंधनकारक करणारा कायदा तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट विधेयकातील तरतूदींवर संबंधित क्षेत्रातील व्यक्ती वा संस्थांचे स्पष्ट अभिप्राय जाणून घेण्यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

एकशिव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याबाबत

(३२) * ४१२१२ श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकशिव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची सोय नसल्यामुळे या ठिकाणाहून १५ ते १८ कि.मी. अंतरावरील नातेपुते येथे रुग्णांना उपचारासाठी जावे लागत असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाव व परिसरातील गावे निरा नदी किनाऱ्यावर असल्यामुळे येथे पावसाळयात दूषित पाणी व येणाऱ्या पुरामुळे साथीचे रोग पसरतात तसेच परिसरातील कुरबावी, डोंबाळवाडी, हनुमानवाडी, तांबेवाडी, कंळबोली, पिरळे गावाची लोकसंख्या ६० हजार असूनही प्राथमिक आरोग्य केंद्राची सोय नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकशिव या मध्यवर्ती ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याची मागणी करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे. मौजे एकशिव येथे उपकेंद्र कार्यान्वित असून याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र मोरोची मार्फत आरोग्य सेवा पुरविल्या जातात.

(२), (३) व (४) मौजे एकशिव व परिसरातील इतर गावांना प्राथमिक आरोग्य केंद्र मोरोची मार्फत प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आरोग्य सेवा पुरविल्या जात असल्याने रुग्णांची गैरसोय होत नाही. तथापि, मौजे एकशिव व परिसरातील गावाची लोकसंख्या विचारात घेवून या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याची मागणी जोड बृहत आराखडयात निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुणे जिल्हा परिषदेचा निधी अखर्चित राहिल्यामुळे विकास कामे प्रलंबित असल्याबाबत

(३३) * ४११३२ श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर जिल्हा परिषदेच्या तुलनेत मोठा अर्थसंकल्प असणाऱ्या पुणे जिल्हा परिषदेने मागील ६ वर्षात मंजूर अर्थसंकल्पापैकी केवळ ६५ ते ६७ टक्के खर्च केला असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे उर्वरित ३० ते ३५ टक्के निधी वेळेत खर्च न केल्यामुळे विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्ह्याचा विकास करण्यासाठी येथील प्रशासन व पदाधिकारी यांच्यात समन्वय ठेवण्याबाबत तसेच निधी अखर्चित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) नाही, दिनांक ६ जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये अखर्चित राहिलेला निधी हा लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेरपर्यंत खर्च करण्यात येतो. विकास कामे प्रलंबित राहिलेली नाहीत.
(३) विकास कामे प्रलंबित रहात नसल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील यात्रास्थळांना/तीर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा मिळणेबाबत

(३४) * ३७९६४ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील श्री शनिदेव मंदिर नस्तनपूर, श्री क्षेत्र जगदंबा देवी मंदिर, कोटमगांव आणि श्री क्षेत्र लोणजाई माता मंदिर, सुभाषनगर इत्यादी यात्रास्थळांना/तीर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा मिळणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मार्च, २०१७ व दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी नाशिक जिल्हा परिषदेकडे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त यात्रास्थळ/तीर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा मिळण्याकरिता शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने यात्रास्थळांना/तीर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१), (२) व (३) होय. तथापि, प्रश्नांकीत तीर्थक्षेत्रांपैकी श्री शनिदेव मंदिर, नस्तनपूर व श्रीक्षेत्र लोणजाई माता मंदिर, सुभाषनगर या तीर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा मिळण्यासाठी शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

सदरहू प्रस्तावांची शासन निर्णयानुसार छाननी केली असता, श्री शनिदेव मंदिर, नस्तनपूर बाबत आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत शासनाच्या दिनांक ०८/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद, नाशिक यांना कळविण्यात आले आहे. तसेच श्रीक्षेत्र लोणजाई माता मंदिर सुभाषनगर या तीर्थक्षेत्रास दिनांक २३/०१/२०१८ रोजीच्या राज्य निकष समितीच्या बैठकीत "ब" वर्ग दर्जा देण्यात आला आहे.

तसेच प्रश्नांकीत उर्वरीत श्री क्षेत्र जगदंबा देवी तीर्थक्षेत्राचा प्रस्ताव शासनस्तरावर योग्य त्या कागदपत्रांनिशी अद्याप प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोठवगाव (जि.गोंदिया) येथील इटियाडोह विश्रामगृहाची दुरवस्था झाल्याबाबत

(३५) * ३९१०२ श्री.परिणय फुके : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोठवगाव (जि.गोंदिया) येथील इटियाडोह विश्रामगृहाची देखभाल व दुरुस्ती नसल्याने दुरवस्था झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काही वर्षापासून पाटबंधारे विभागाने विकास निधी उपलब्ध करुन दिला नसल्याने तसेच कंत्राटी पध्दतीने देखभाल दुरुस्तीची कामे केली जात असल्याने विश्रामगृहाची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गिरीष महाजन : (१) विश्रामगृहाची काही प्रमाणात दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तथापि, विश्रामगृह वापरण्यायोग्य आहे.

(२) प्रकल्प व कालवे वितरण प्रणाली तसेच इमारतीची देखभाल दुरुस्तीची कामे ही प्रकल्पाच्या वसूल झालेल्या सिंचन/बिगर सिंचन पाणीपट्टी मधून करण्याचे धोरण आहे. अत्यावश्यक किरकोळ दुरुस्तीची कामे कंत्राटी पध्दतीने करण्यात येतात. तथापि, विश्रामगृहाची देखभाल दुरूस्ती हा प्रथम प्राधान्याचा विषय नाही. सद्य:स्थितीत विश्रामगृह वापरण्यायोग्य आहे.

(३) आवश्यकता नाही.

इमारत दुरूस्ती अंतर्गत निधी उपलब्धतेनुसार व प्राधान्यक्रमानुसार आवश्यक कामे हाती घेण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) येथील मनोरुग्णालय कार्यान्वित करणेबाबत

(३६) * ४०१७७ श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे सन २००७-०८ मध्ये सुमारे ६० कोटी रुपये खर्च करून शासनाने मनोरुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयाच्या पद निर्मितीचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला असून रुग्णालयाची इमारत आणि पद भरती पूर्ण झालेली असतानाही अद्याप मनोरुग्णालय कार्यान्वित झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्णालय कार्यान्वित होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

अंबाजोगाई येथील वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार उपचार केंद्राच्या बांधकामासाठी रुपये २०.०१ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

या ठिकाणी वृध्दत्व आरोग्याबरोबरच अन्य आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सुयोग्य अशा आरोग्य संस्थेस मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अजिंठा लेणी (जि.औरंगाबाद) परिसरातील पर्यटक निवास आरक्षण केंद्र सुरु करण्याबाबत

(३७) * **४१०६९ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील जगप्रसिध्द असलेले अजिंठा लेणी पाहण्यासाठी देश-विदेशातून मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात मात्र टी पॉईंट परिसरात असलेले महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक माहिती केंद्र व पर्यटक निवास आरक्षण केंद्र गत एक वर्षापासून बंद असल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंद असलेले आरक्षण केंद्र त्वरीत सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार रावल : (१), (२) व (३) दिनांक ०१/१०/२०१७ पासून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक माहिती केंद्र व आरक्षण केंद्र अजिंठा टी पॉईंट परिसरात सुरु करण्यात आले आहे.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.